दै. गोदातीर दि. 02/11/2025

# नांदेड ग्रामीण पोलिसांच्या कारवाईत सव्वापाच लाख रुपयांच्या चोरीच्या दहा दुचाकी जप्त; एकाला अटक

नांदेड (प्रतिनिधी) – शहर आणि परिसरात विशेष करून नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतून दुचाकी चोऱ्या करून पोलिसांना चकमा देणारा आरोपी गुन्हे शोध पथकाच्या तावडीत सापडला. पथकाने त्याच्याकडून तब्बल सव्वा पाच लाख रुपयांच्या विविध कंपनीच्या दहा चोरीच्या दुचाकी जप्त केल्या आहेत.

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये विशेष करून विष्णुपुरी हॉस्पीटल व काळेश्वर मंदिर या ठिकाणांवरून अनेक दुचाकी चोरी गेल्या असून, त्याबाबत चोरीचे गुन्हे रोखण्यासाठी व उघड करण्यासाठी वरिष्ठांच्या आदेशावरून पोलीस निरीक्षक ओमकार चिंचोलकर यांनी आपल्या शोध पथकाला सूचना दिल्या. पथकाने दि. १ नोव्हेंबर रोजी नांदेड ग्रामीण ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील वेगवेगळ्या दुचाकीमधील संशयीत आरोपीचा शोध घेत असताना त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, हस्सापूर गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक युवक हा संशयीतरित्या फिरत आहे. त्यावरून सदर ठिकाणी जावून सापळा रचून त्यास ताब्यात घेतले. त्याचे नाव नवनाथ बालाजी वडजे (वय २३ वर्षे रा. वडरवाडा ता. मुखेड, जि. नांदेड) असे आहे. त्यास अधिक विश्वासात घेवून चौकशी केली असता



त्याच्याकडे वेगवेगळया कंपनीच्या एकूण १० दुचाकी मिळाल्या. त्यास सदर दुचाकीच्या मालकी हक्काबाबत विचारपूस केली असता त्याने सांगितले की, सदर दुचाकी नांदेड ग्रामीण व नांदेड जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणाहुन चोरी केल्या आहेत. त्याचे ताब्यातून नांदेड ग्रामीण हद्दीतील ६ दुचाकी, वजिराबाद हद्दीतील १ व इतर १, नायगाव हद्दीतील १, धर्माबाद येथील १ अशा एकूण १० मोटार-सायकल किंमत अंदाजे ५ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कामगिरीमध्ये जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्याचे १० गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपीकडे अधिक तपास सुरू आहे. सदरची उत्कृष्ट कामगिरी करणारे अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस अधीक्षकांनी अभिनंदन केले आहे.